मार्च-18 2017/18


VOL-06

Special Issue March 2018

# Vidyawarta®

## International Multilingual Research Journal

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318



Chief Editor
**Prof. Virag Gawande**

Published By
Aadhar Social Research Development Training Institute, Amravati.

(16)

# विद्यावार्ता

Dist. Yavatmal Reg. No. 2568

Shivramji Moghe Arts, Commerce & Science College,
Kelapur (Pandharkawada) Dist. Yavatmal - 445302 (M.S.)
Affilated to Sant Gadge Baba Amravati University, Amravati)

On the Occasion of World Women's Day
An Interdisciplinary International Conference On

# Globalization : Issues & Aspects
## ICGIA – 2018

Thursday 8Th March 2018

**Dr. Shankar R. Warhate**
Principal, Shivramji Moghe Mahavidyalaya, Kelapur (Pandharkawada)

**Chief Editor**
Prof. Virag Gawande
Director, Aadhar Social Research & Development Training Institute Amravati

**Editors**
Dr. Arun Dasode   Prof. Naresh Mahajan   Dr. Sujata Shende
Dr. Radheshyam Chaudhari   Dr. Ajay Solanke   Dr. Amar J. Wanjari

Organized by
Shivramji Moghe Arts, Commerce & Science College,
Kelapur (Pandharkawada) Dist. Yavatmal - 445302 (M.S.)
&
Aadhar Social Research & Development Training Institute Amravati

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh, Tq.Dist.Beed

13) जागतिकीकरण आणि मराठी कविता
प्रा. नंदकुमार ग.भाकरे || 59

14) जागतिक तापमान वाढ आणि पर्यावरणीय प्रदूषण : एक अभ्यास
प्रा. एन. व्ही. नरुळे || 6

15) खेळांमध्ये संतुलित आहाराची भूमिका
पांडुरंग जगन्नाथ गोटे || 6

16) जागतिकीकरणाचा लोकसाहित्यावरील प्रभाव
प्रा.डॉ.पंढरी डोईफोडे ||

17) 'जागतिकीकरण व २१ व्या शतकातील स्त्री'
कु. पायल विनोद भोयर ||

18) जागतिकीकरणाचा समाजावर पडणाऱ्या प्रभावाचे अध्ययन
प्रा. संजय च. राऊत ||

19) खेळ आणि योगासनाचे शालेय विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्वावर होणारे सकारात्मक...
प्रा. नितु जि. शेंडे, यवतमाळ ||

20) जागतिकीकरण आणि नव्वदोत्तर आंबेडकरी कविता
प्रा. नरेंद्रकुमार शिवाजीराव कदम, जि. यवतमाळ ||

21) Globalization : It's Advantages and Disadvantages
Prof. Ajay V Rele ||

22) Effectiveness of training in changing adoption behavior ........
Shital Deshmukh, Manisha Kale ||

23) Marketing of Small Scale & Cottage Industries in Rural India
Shri. N. H. Shegokar || 8

24) Emerging Opportunities And Challenges/ Problems For ......
Ku. Sonali Sanjay Gosavi || 95

25) Study on the role of Machine Learning Algorithms in ......
Mr. Prabhanajn G. Chaudhari || 98

://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

**16**

# जागतिकीकरणाचा लोकसाहित्यावरील प्रभाव

प्रा.डॉ.पंढरी डोईफोडे
सहयोगी प्राध्यापक सिंदखेड राजा.

**प्रस्तावना :**

साहित्यातून जसे मानवी जीवन आणि संस्कृतीचे दर्शन घडते तसेच ते समता, मानवता, सहृदयता, सामाजि ऐक्य आणि सद्भावना अशा सारख्या सामाजिक तसेच काही राष्ट्रीय मूल्यांची रुजवणूक व्हावी यासाठी मार्गदर्शक असावे अशीही अपेक्षा असते. बदलत्या सामाजिक परिस्थितीत विशेषतः जागतिकीकरणाच्या छायेतील समाजात ही भूमिका उठून दिसते.

पुढे लोकसाहित्यात अनेक संकल्पना येत गेल्या, तरी मौखिक साहित्याच्या मूलधारावरच लोकसाहित्याचा अभ्यास केला जावा हे सर्वमान्य झाले. रुढी परंपरा या लिखित स्वरुपात नसतात. काळानुरूप त्या बदलत जात असतात- तरी लोकधारेत बदल होताना मात्र दिसत नाही. फक्त त्यांचे स्वरुप बदलते. हे पाहणे गरजेचे आहे. निसर्गाच्या कृपेमुळे आपल्या जीवनात बदल घडू शकतात. असा समज त्याकाळच्या आर्येतर लोकांचा होता. आर्यांच्या आगमनामुळे लोक श्रध्दा मोठ्या प्रमाणात बदलत गेल्या. आर्य आणि आर्येत्तर समाजातील सांस्कृतिक संघर्ष होऊ लागला. आर्यांचे यज्ञ व धार्मिक विधी पाहून आर्येतर समज आकर्षित होऊ लागला. आपल्या संस्कृतीमधील काही रुढी परंपरा जतन करीत, आर्य संस्कृतीचा स्वीकार करु लागला यामधून आर्येत्तर लोकांच्या जीवनाला वेगळे वळण प्राप्त झाले.

**समाजव्यवस्थेतील ठळक कालखंड :**

गावगाडा हे तत्कालीन समाजव्यवस्थेचे व्यवच्छेदक लक्षण होते. ग्रामीण समाज आणि त्याला समांतर जीवनशैली अस्तित्वात होती. गावातली सारी कामे गावातच होत असत. गाव हे विश्व होते. गावातल्या लोकांच्या गरजा मर्यादीत होत्या, आणि त्या गावातच भागवल्या जात. एखादी घटना सर्वांपर्यंत पोहोचली की ती गावभर झाली असे म्हटले जाई. विकासाच्या इतर बाबीप्रमाणे शिक्षणप्रसारही नव्हता. मोजक्या शहरातूनही ठराविक कॉलेजेस होती. शाळाही मोठ्या गावातच होत्या. या सर्व घटना लोकसाहित्यात होत्या. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला साधारणत भारतीय समाजाची स्थिती फारच दयनीय होती. महिलांचे हे प्रमाण अगदी नगण्यच होते. महिलांना चूल आणि मूल यातच धन्यता वाटत होती. याचबरोबर शिक्षण घेण्यात धार्मिक बंधनं आणि सांस्कृतिक दडपणं देखील होती. साक्षरता नसल्याने वाचनदेखील नव्हते. लोकसंस्कृती नुसारच लोकांची जडण-घडण होती.

स्वातंत्र्यानंतर लोकशाही राज्यप्रणालीत इथल्या राज्यकर्त्यांना अपेक्षीत आणि अभिप्रेत असल्याने जनतेकडूनही वाढलेल्या अपेक्षा आणि आकांक्षा या सर्वांचा परिपाठ म्हणून शिक्षण विस्तारत गेले. अगदी खेड्यापाड्यातूनही शाळा तर तालुक्याच्या गावी कॉलेजेस सुरू झाली. आरक्षणामुळे समाज जागृत झाला. शिक्षणात स्पर्धा वाढली. उद्योगधंदे, नोकऱ्यांची संख्या वाढली. लोकसंस्कृतीत बदल झाला. सामाजिक पर्यावरणात लोकसाहित्याचे स्वरुप बदलत गेले. औद्योगिक क्रांती, दळणवळण, शिक्षणाचा प्रसार, विज्ञानाचा विकास याचा प्रथमतः परिणाम शहरी संस्कृतीवर झाला. त्याचे लोण ग्रामीण भागापर्यंत येऊन पोहचले. यामुळे रुढी परंपरागत जगणाऱ्या लोकांत अमूलाग्र बदल झाला.

**जागतिकीकरणाचा लोक जीवनावरील परिणाम :**

रुढी परंपरागत जगणाऱ्या लोकांत पारंपारीक शेती व्यवसायात जसा बदल झाला तरी पारंपारिक व्यवसाय करणारे सुतार-लोहार या सारख्या सर्व बलुतेदारावर झाला. यांचे पारंपारिक व्यवसाय कालमडून गेले. त्यांच्या व्यवसायाची जागा भांडवली वर्गाने घेतली. हा समाज पारंपारिक व्यवसाय सोडून इतर कामे करु लागला. यामुळे परंपरागत चालत आलेली मौखिक परंपरा बदलत्या परिस्थितीत तग धरु शकली नाही. त्यांच्या पारंपारिक व्यवसाय- साहित्य लोकसाहित्याने जतन केले.

शिक्षण म्हणजे वाचन आणि लेखन इतकेच मर्यादित न राहता व्यवसाय व नोकरीची उपलब्धता करुन देणारे असले पाहिजे. याचा लाभ मात्र शहरी लोकांनाच मिळत गेला. परंपरागत जगणाऱ्या लोकांच्या नशिबी तीच रुढी-परंपरा वाट्याला आली. मौखिक परंपरा याच लोकांच्या भोवती टिकून राहिली. असा समज आधुनिक जीव[न] जगणाऱ्या लोकांनी करुन दिला. लोकसाहित्य अशिक्षीत, अविकसि[त] निम्नवर्गीय व रानटी लोकांचे लक्षण समजले जात. असा समज पाश्चा[त्य] संस्कृतीचा स्वीकार करणाऱ्या लोकांनी पध्दतीशरपणे करुन दि[ला] म्हणजे जागतिकरणाच्या प्रक्रियेत ग्रामीण समाजाला उपेक्षीत ठ[ेवले] गेले. परंतु लोकसाहित्याची व्याप्ती लक्षात घेवून शेती उपयोगी साहि[त्य] पोपाख, भांडी, अलंकार, घराची रचना, ग्राम संस्कृती दैनंदि[न] वापरातील वस्तू इत्यादी अभ्यास लोकसाहित्यातून लोकांसमोर आ[णला] गेला.

**जागतिकीकरणाचा लोकसाहित्यावरील प्रभाव :**

ग्रामीण आणि शहरी संस्कृतीमध्ये आजा मूलगामी फरक केला जात नाही. कारण शहरी संस्कृतीत राहणाऱ्या व्यक्तिंच्या जीवनाला ग्राम समाजाचे वावडे नसते. अभ्यासाच्या दृष्टीने दोन्ही समाज एकाच मुशितून तयार झालेले असतात. म्हणजेच मौखिक परंपरेचा विकास बदलत्या समाज व्यवस्थेत कसा झाला इतकीच अपेक्षा साहित्यिकाकडून येत असते. आजच्या साहित्यातून मिथकाचा वापर केला जात आहे. या मिथकांच्या आधारे आधुनिक साहित्य म्हणून विकसित झाले आहे. मिळाक हे लोक व्यवहार इतके रुजले आहे की ते मानवी जीवनाचा अविभाज्य अंग बदले आहे. मिळकांच्या द्वारा एकुणच मानवी अस्तित्वाच्या गाभ्याशी भिडणं कोणत्याही युगातील ज्ञान शाखेला उपकार ठरते. जागतिकीकरणात मिथकाचा संकर मोठ्या प्रमाणात होत आहे. सांस्कृतिक अस्मिता व सांस्कृतिक सापेक्षता, सांस्कृतिक वैश्विकता व बहुसंस्कृतीकला प्रांतभाशास्त्र वगैरे प्रश्न ऐरणीवर आले आहेत. मिथके ही प्रतिक्षा वाढविण्यासाठी कायमच उपयोगात आणली जातात. उदा.प्रत्येक समाजाची श्रध्दा ही मिथक साहित्यातून पाहिली जाते.

समाजातल्या अनेक घटकांसाठी अनेक पातळीवरच्या शासकीय कल्याणाच्या योजना उपलब्ध असून केवळ प्रसाराच्या कमतरतेमुळे लाभार्थीपर्यंत त्या पोहोचत नाहीत. लोकसंख्येच्या प्रमाणात मोठ्या प्रमाणात निधी असलेल्या आदिवासी उपाययोजना उदाहरणादाखल सांगता येतील. या काळीही लोकसाहित्य प्रभावी ठरु शकेल. कारण शासकीय भाषेपेक्षा लोकसाहित्यातून ते लोकांना वाचावेसे वाटेल. अशा काही लाभ घेतलेल्यांच्या यशस्वी कथा साहित्याचे आणि लोकजीवनाचे आधारस्तंभ बनतील.

**समारोप :**

जागतिकीकरणात लोकसाहित्याच्या संदर्भात अभ्यासकांनी संशोधनात्मक लेखनामधून लोकसाहित्याबद्दल अपसमज दूर करणे आणि लोकसाहित्याच्या अभ्यासास शास्त्रीय बैठक प्राप्त करुन देऊन यावरोवर लोकसाहित्याला आंतर विद्या शाखीय संशोधन प्राप्त करुन देणे. लोकसाहित्याच्या संभाव्य क्षेत्रांचा शोध घेणं. अशी विविध कामगीरी करावयाला हवी. कलेच्या क्षेत्रात लोक साहित्याचा उपयोग मोठ्या प्रमाणात आजतागायत केला जातो. जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे आविष्काराच्या सामर्थ्याला प्राप्त झालेले परिणाम. मराठी व हिन्दी चित्रपटातील लोकप्रिय गीतांमध्ये उपयोजन. त्या आधारे लोकगीतांतील लोकप्रियतेच्या घटकांचा शोध या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचविला जातो.

**निष्कर्ष :**

१. मराठी साहित्याचा विकास हा मौखिक परंपरेतून झाला आहे. लोकपरंपरा ही मानवी जीवनाशी जडण घडण संगत असते. त्यामुळेच आपल्या मूळ परंपरा, भाषा लोक समजुती इत्यादी अभ्यास चिकित्सकपणे केला जाऊ शकतो.

२. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत भांडवली व्यवस्थेने प्रत्येक क्षेत्रावर आपली मक्तेदारी प्रस्थापित केली. लोकांपर्यंत अनेक वस्तूंची उपलब्धता करुन दिली. देशाच्या विकासाला चालना मिळाली.

३. जो समाज विस्थापित होऊन भारतात आला म्हणजे संमिश्र संस्कृतीचा बनला गेला. पारंपारिक समाज आधुनिक समाजाच्या संस्कृतिच्या संस्कृतिचा स्वीकार करु लागला.

□□□